आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१ फेब्रुवारी २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- आगामी आर्थिक वर्षासाठी ५० लाख ६५ हजार कोटी रुपये खर्चाचा केंद्रीय अर्थसंकल्प संसदेत सादर /संरक्षण, ग्रामीण विकास, कृषी क्षेत्रासाठी भरीव तरतूद, आकांक्षित जिल्ह्यांसाठी प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजनेची घोषणा, कापूस, डाळी, तेलबियांसाठी विविध योजना
- नवीन आयकर रचनेत १२ लाखापर्यंतचं उत्पन्न करमुक्त, करदरातही कपात, कर्करोगावरची औषधं, दुचाकी, पादत्राणे, कृत्रिम दागिने स्वस्त होणार
- देशातल्या नागरिकांना विकासाचे भागीदार बनवण्याचा पाया घालणारा हा अर्थसंकल्प असल्याची प्रधानमंत्र्यांची प्रशस्ती, तर निराशा करणारा अर्थसंकल्प असल्याची विरोधकांची टीका

**आणि**

- रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत मुंबईचा मेघालयावर एक डाव आणि ४५६ धावांनी विजय

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी ५० लाख ६५ हजार कोटी रुपयांचा खर्च प्रस्तावित असलेला अर्थसंकल्प आज लोकसभेत सादर केला.

या माध्यमातून येत्या ५ वर्षात सर्वांचा विकास करण्याचं सरकारचं उद्दिष्ट असल्याचं त्यांनी सांगितलं. त्यात गरीब, युवा, शेतकरी आणि महिलांना प्राधान्य दिलं जाणार आहे. आर्थिक वृद्धीला चालना, सर्वंकष विकास, खासगी क्षेत्राच्या गुंतवणुकीला प्रोत्साहन, सर्वसामान्यांच्या आकांक्षांना उभारी देणारा आणि मध्यमवर्गाला आणखी बळकट करणारा हा अर्थसंकल्प असल्याचं सीतारामन यांनी सांगितलं. हा अर्थसंकल्प कर निर्धारण, ऊर्जा, शहरी विकास, खाणकाम, वित्त आणि नियामकीय क्षेत्रात सुधारणा घडवून आणणारा आहे, असंही त्या म्हणाल्या.

अर्थसंकल्प सादरीकरण सुरू झाल्यावर कुंभमेळ्यातल्या दुर्घटनेच्या मुद्द्यांवरुन विरोधकांनी काही काळ सभात्याग केला होता. अर्थसंकल्प मांडल्यानंतर दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

या अर्थसंकल्पातल्या प्रस्तावित खर्चापैकी ३४ लाख २० हजार कोटी रुपये कर महसुलातून मिळणार आहेत. या अर्थसंकल्पात ४ पूर्णांक ४ दशांश टक्के वित्तीय तूट अर्थमंत्र्यांनी प्रस्तावित केली आहे. चालू आर्थिक वर्षात हे प्रमाण ४ पूर्णांक ८ दशांश टक्के राहण्याची अपेक्षा आहे.

या अर्थसंकल्पात संरक्षण क्षेत्रासाठी ४ लाख ९१ हजार कोटी, ग्रामीण विकासासाठी २ लाख ६६ हजार कोटी, कृषीसाठी १ लाख ७१ हजार कोटी, शिक्षणासाठी १ लाख २८ हजार कोटी आणि आरोग्य क्षेत्रासाठी ९८ हजार कोटी रुपयांहून अधिक खर्चाची तरतूद आहे. समाज कल्याणासाठी ६० हजार ५२ कोटी आणि विविध वैज्ञानिक विभागांसाठी ५५ हजार कोटी रुपयांहून अधिक तरतूद अर्थसंकल्पात आहे.

वीमा क्षेत्रातली थेट परकीय गुंतवणुकीची मर्यादा आता ७४ टक्क्यांवरुन १०० टक्के केली आहे.

**<><><><><>**

देशभरातल्या शंभर आकांक्षित जिल्ह्यांमध्ये राज्यांच्या सहकार्याने **प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजना** राबवणार असल्याचं अर्थमंत्र्यांनी सांगितलं. उत्पादन वाढ, शाश्वत शेती पद्धतीचा अवलंब, पंचायत आणि गट स्तरावर साठवणूक क्षमतावृद्धी, सिंचन सुविधा सुधारणं, दीर्घकालीन आणि अल्पकालीन कर्ज उपलब्ध करून देणं हे याचं उद्दिष्ट आहे. याचा लाभ दीड कोटीपेक्षा जास्त शेतकऱ्यांना होणार आहे. किसान क्रेडिट कार्डद्वारे साडे सात कोटींपेक्षा जास्त शेतकरी, मच्छिमार आणि दूध उत्पादक शेतकऱ्यांना अल्प मुदतीचं कर्ज उपलब्ध करून दिलं जाणार आहे. सुधारित व्याज अनुदान योजने अंतर्गत कर्ज मर्यादा तीन लाखांवरुन ५ लाख रुपयांपर्यंत वाढवली आहे.

**ग्रामीण समृद्धी** आणि लवचिकता कार्यक्रम राबवला जाणार असल्याचं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितलं. याद्वारे कृषी क्षेत्रातल्या बेरोजगारांना कौशल्य, तंत्रज्ञान पुरवलं जाईल. याचा फायदा महिला, तरुण शेतकरी, ग्रामीण युवक, अल्पभुधारक यांना होणार आहे.

तेलबियांसाठी सरकार राष्ट्रीय अभियान राबवणार आहे. तूर, उडीद, मसूर यांना केंद्रस्थानी ठेवून ६ वर्षांचा आत्मनिर्भर कार्यक्रम आखला जाईल, **कापसा**चं उत्पादन वाढवण्यासाठीही विशेष कार्यक्रम आखला जाईल, असं सीतारामन यांनी सांगितलं. नोंदणीकृत शेतकऱ्यांकडून पुढील चार वर्षांसाठी तेलबीयांची खरेदी नाफेड आणि NCCF कडून केली जाईल, असं त्यांनी सांगितलं.

**जलजीवन** मिशन अंतर्गत शंभर टक्के घरांना नळजोडणी करण्यासाठी याची मुदत २०२८ पर्यंत वाढवल्याचं अर्थमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

पुढच्या आठवड्यात नवीन आयकर विधेयक आणण्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी आज केली. टॅक्स रिबेटच्या सोयीमुळं १२ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असलेल्यांना नवीन कर रचनेनुसार कुठलाही आयकर द्यावा लागणार नाही, अशी मध्यमवर्गासाठी खूषखबर त्यांनी आजच्या भाषणात दिली. नोकरदारांना ७५ हजार रुपयांचं standard deduction मिळत असल्यानं त्यांना पावणे १३ लाख

रुपयांच्या उत्पन्नावर काहीही आयकर द्यावा लागणार नाही. यामुळे १ कोटी करदाते करमुक्त होतील, अशी माहिती अर्थमंत्र्यांनी वार्ताहर परिषदेत दिली.

नवीन कर रचनेत असलेल्या करांच्या दरांमध्येही सुधारणा त्यांनी आज जाहीर केल्या. त्यानुसार आता ४ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असलेल्यांना कुठलाही कर द्यावा लागणार नाही, यापूर्वी ही मर्यादा ३ लाख रुपये होती. त्यापुढील उत्पन्नावर असलेल्या करांच्या दरांमध्येही त्यांनी मोठी सवलत दिली आहे. त्यामुळे नवीन कर रचना मोठ्या प्रमाणात आकर्षक झाली आहे. पूर्वी नवीन कर रचनेत १५ लाखांच्या वर असलेल्या उत्पन्नावर ३० टक्के दराने कर द्यावा लागत होता आणि आता २४ लाखाच्या वर असलेल्या उत्पन्नावर ३० टक्के दराने कर द्यावा लागेल. नवीन कर रचनेअंतर्गत

४ ते ८ लाख रुपयांदरम्यानच्या उत्पन्नासाठी ५ टक्के,

८ ते १२ लाख रुपयांदरम्यानच्या उत्पन्नासाठी १० टक्के,

१२ ते १६ लाख रुपयांच्या दरम्यान असलेल्या उत्पन्नासाठी १५ टक्के,

१६ ते २० लाखांसाठी २० टक्के आणि २० ते २४ लाखासाठी २५ टक्के दराने आयकर द्यावा लागेल.

यामुळं १२ लाखापर्यंत उत्पन्न असणाऱ्यांचा ८० हजार रुपये आयकर वाचेल. १८ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असणाऱ्यांचा ७० हजार आणि २५ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असणाऱ्यांचा १ लाख १० हजार रुपये आयकर

वाचेल. ज्येष्ठ नागरिकांना व्याजातून मिळणाऱ्या १ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर कुठलाही TDS द्यावा लागणार नाही. यापूर्वी ही मर्यादा ५० हजार रुपये होते. याशिवाय TDS आणि TCS साठीही अर्थमंत्र्यांनी अनेक सुधारणा जाहीर केल्या. सुधारित आयकर विवरण पत्र भरण्याची मुदत आता २ वर्षांवरुन ४ वर्ष केली आहे. याशिवाय क्रिप्टो चलनाच्या माध्यमातून असलेली मालमत्ताही जाहीर करावी लागणार आहे.

<><><><><>

अर्थमंत्र्यांनी आजच्या अर्थसंकल्पात कर्करोग, दुर्मिळ आजार आणि इतर गंभीर आजारांवरच्या ३६ औषधांना आयात शुल्कातून पूर्ण माफी दिली आहे. याशिवाय ६ जीवनरक्षक औषधांवरचं ५ टक्के सवलतीच्या दरातून आयात शुल्क द्यावं लागेल. याशिवाय सुरीमी, कॅमेरा तसंच हेडफोनचे सुटे भाग, PCB चे भाग, मोबाइलचे सेन्सर, LED आणि LCD चे भाग, दुचाकी यांच्यावरही आयात शुल्कात सवलत दिल्यानं या वस्तू स्वस्त होतील. मार्बल, ग्रॅनाइट, पादत्राणे, PVC बॅनर, सौर बॅटरी, लोह आणि स्टीलच्या काही वस्तू, स्मार्ट इलेक्ट्रिक मीटर, कृत्रिम दागिने, दुचाकी वाहनं यासारख्या वस्तूंवरच्या शुल्कातही कपात झाल्यानं या वस्तू स्वस्त होतील.

<><><><><>

या अर्थसंकल्पात सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग क्षेत्रातलं वर्गीकरण बदललं आहे. अडीच कोटींपर्यंत सूक्ष्म उद्योग, २५ कोटींपर्यंत लघू आणि १२५ कोटीपर्यंत गुंतवणूक असलेल्या उद्योगांना मध्यम उद्योगांचा दर्जा मिळेल. या उद्योगांसाठी असलेली उलाढालीची मर्यादाही आता वाढवून अनुक्रमे १० कोटी, १ अब्ज आणि ५ अब्ज इतकी केली आहे. उद्योग पोर्टलवर नोंदणीकृत असलेल्या सूक्ष्म उद्योगांसाठी पाच लाख रुपये मर्यादेचं क्रेडिट कार्डही देण्यात येणार आहे.

याशिवाय चर्म उद्योग, खेळणी, अन्नप्रक्रिया, पर्यावरण पूरक तंत्रज्ञान निर्मिती अशा विविध क्षेत्रांसाठीही संस्थांची स्थापना आणि योजनांवर अर्थसंकल्पात भर दिला आहे.

**<><><><><>**

येत्या तीन वर्षांत प्रत्येक जिल्हा रुग्णालयात कर्करुग्णांसाठी उपचार केंद्र उभारली जातील. त्यातली २०० केंद्र येत्या आर्थिक वर्षातच उभारली जातील. याशिवाय पुढच्या वर्षी वैद्यकीय महाविद्यालयात दहा हजार जागा वाढवल्या जातील, तसंच पुढच्या पाच वर्षांत ७५ हजार जागा वाढतील असं सीतारामन यांनी सांगितलं.

सक्षम अंगणवाडी आणि पोषण योजनेच्या दुसऱ्या टप्प्यासाठी या अर्थंसकल्पात निधी वाढवला आहे, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

२०२५-२६ च्या अर्थसंकल्पात १४० कोटी भारतीयांच्या आशा आकांक्षा पूर्ण करण्याच्या सरकारच्या वचनबद्धतेचं प्रतिबिंब दिसतं अशी प्रतिक्रिया प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केंद्रीय अर्थसंकल्पावर दिली. देशातले नागरिक विकासाचे भागीदार बनतील, याचा पाया या अर्थसंकल्पानं घातला आहे, रोजगाराच्या प्रत्येक क्षेत्राला प्राथमिकता दिली गेली आहे, असं ते म्हणाले.

**<><><><>**

केंद्रीय अर्थसंकल्प हा मध्यमवर्गीयांसाठी 'ड्रीम बजेट' असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली आहे. राज्यासाठीच्या तरतुदींविषयी ते म्हणाले…

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं विकसित भारताचं स्वप्न साकार होण्याची खात्री देणारा हा अर्थसंकल्प आहे, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे.

देशाला आर्थिक महासत्ता आणि विकसित राष्ट्र बनण्याच्या वाटेवर नेणारा हा अर्थसंकल्प आहे, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

**<><><><>**

केंद्रीय अर्थसंकल्पात मुंबईतल्या मेट्रोसाठी १ हजार २५५ कोटी,तर पुणे मेट्रोसाठी सुमारे ७०० कोटी रुपयांची तरतूद असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी समाज माध्यमांवरील संदेशात सांगितलं. बुलेट ट्रेनसाठी ४ हजार कोटी, इकॉनॉमिक क्लस्टरसाठी सुमारे अकराशे कोटी रुपयांची

तरतूद आहे.  नागनदी सुधार प्रकल्पाला २९५ कोटी **तर मुळा-मुठा** नदी संवर्धनासाठी २३० कोटी रुपये राखून ठेवले आहेत.

**<><><><><>**

अर्थसंकल्पात १२ लाखांपर्यंतचं उत्पन्न करमुक्त करून सवलत दिल्याचा आभास निर्माण केला आहे, परंतु महागाईमुळे कंबरडे मोडलेल्या जनतेची नुकसानभरपाई त्याने होणार का, असा सवाल माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे. हा अर्थसंकल्प निराशा करणारा असून काँग्रेस पक्ष याचा निषेध करत आहे असं ते म्हणाले.

**<><><><><>**

शेतकरी कर्जमाफी, हमीभाव यावर  अर्थसंकल्पात काहीच नाही, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली. या अर्थसंकल्पाने गुंतवणूकदार प्रभावित झाले नाहीत. तसंच शेतकरी, व्यापारी व सामान्य नागरिकांचीही निराशाच केली आहे, अशी प्रतिक्रिया पटोले यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

या अर्थसंकल्पाबद्दल आकाशवाणीशी बोलताना मुंबईतल्या गृहिणी वैशाली पवार यांनी आनंद व्यक्त केला….

**<><><><><>**

नवोदित उद्योजकांना प्रोत्साहन मिळावं यासाठी १० हजार कोटी रुपयांच्या निधीसह स्टार्टअपसाठीच्या निधी योजनेच्या पुढच्या टप्प्याची घोषणा

निर्मला सीतारामन यांनी आज अर्थसंकल्पात केली. प्रथमच व्यवसाय करणाऱ्यांसाठी, महिलांसाठी तसंच, अनुसूचित जाती-जमातीतल्या उद्योजकांसाठी नवी योजना आणली असून या योजनेंतर्गत संबंधित उद्योजकांसाठी पुढच्या पाच वर्षांत २ कोटी रुपयांपर्यंतची कर्ज मंजूर केली जातील.

<><><><><>

उडान योजनेत आता १२० नवीन स्थळांची भर पडणार असून पुढच्या १० वर्षांत अतिरिक्त ४ कोटी प्रवाशांना याचा लाभ मिळेल, अशी घोषणा सीतारामन यांनी आज केली.

<><><><><>

एक कोटी असंघटित कामगारांची ई श्रम पोर्टलवर नोंदणी केली जाईल, तसंच ओळखपत्र दिलं जाईल, त्यांना प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत आरोग्य सुविधा पुरवल्या जातील. बँकांकडून वाढीव कर्ज, ३० हजार रुपयांची मर्यादा असलेली यूपीआयशी संलग्न क्रेडिट कार्ड आणि प्रधानमंत्री स्वनिधी योजनेत वाढ केली जाईल, अशी घोषणा अर्थमंत्री सीतारामन यांनी या अर्थसंकल्पात केली आहे.

<><><><><>

दीड लाख ग्रामीण टपाल कार्यालये, इंडिया पोस्ट पेमेंट बँक आणि २ कोटी ४० लाख टपालसेवकांच्या माध्यमातून भारतीय टपाल खातं, ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी उत्प्रेरक म्हणून काम करेल. टपाल कार्यालयांच्या देशभर विणलेल्या जाळ्याच्या सहाय्यानं टपाल खात्याचं एका मोठ्या लॉजिस्टिक संस्थेत रुपांतर करण्याची सरकारची योजना आहे, असं अर्थमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत मुंबईत झालेल्या सामान्यात मुंबईनं मेघालयावर एक डाव आणि ४५६ धावांनी विजय मिळवला. मुंबईनं पहिल्या डावात मेघालयाचा संपूर्ण संघ ८६ धावात गारद केल्यानंतर ७ बाद ६७१ धावांवर काल आपला पहिला डाव घोषित केला होता. मेघालयाचा दुसरा डाव आज १२९ धावांवर आटोपला.

मुंबईकडून शार्दुल ठाकुरनं दोन्ही डावात मिळून ८ गडी बाद केले. पहिल्या डावात त्यानं ८४ धावांचं योगदानही दिलं होतं. तो या सामन्यातला सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरला.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात विदर्भात काही ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय वाढ झाली, तर मध्य महाराष्ट्रात काही तुरळक ठिकाणी किंचित वाढ झाली .

राज्यात सर्वात कमी किमान तापमान नाशिक इथं १२ पूर्णांक ३ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र  हवामान कोरडं राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**